सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाज्योती
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र.महाज्योती/आस्था./UPSC/२०२४/3583 दि.२४/१२/२०२४

# परिपत्रक

**विषय : UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेण्याबाबत सूचना**

UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता दि.१०,११ व १२ ऑगस्ट २०२४ रोजी परीक्षा घेण्यात आलेली होती, त्याद्वारे एकूण १००० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली होती. त्यापैकी ८६२ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील प्रशिक्षण संस्थांमध्ये UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेला आहे, त्यामुळे १३८ विद्यार्थी अद्याप प्रवेश घेणे बाकी आहे. अश्या विद्यार्थ्यांना UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी **दिल्ली** येथील प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेण्याबाबत खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:

१) दि.१०,११ व १२ ऑगस्ट २०२४ रोजी छाननी परीक्षेत पात्र ठरलेल्या व अद्याप कोणत्याही प्रशिक्षण संस्थेत प्रवेश न घेतलेल्या १३८ विद्यार्थ्यानाच प्रशिक्षण संस्था निवडीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२) विद्यार्थ्यांनी www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील सूचना फलकावर (Notice Board) जाऊन **"UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यासाठी प्रशिक्षण संस्था निवडीकरिता लिंक"** यावर जाऊन नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाने लॉगीन करून प्रशिक्षण संस्था निवडीबाबत १, २ व ३ असे प्राधान्यक्रम द्यावेत.

३) महाज्योती संस्थेमार्फत खालील तीन प्रशिक्षण संस्थांची निवड करणे विचाराधीन आहे.

- श्रीराम IAS अकादमी, दिल्ली
- शुभ्रा रंजन IAS अकादमी, दिल्ली
- नेक्स्ट IAS अकादमी, दिल्ली

४) वरील प्रशिक्षण संस्थांच्या महाज्योतीने निश्चित केलेल्या क्षमतेनुसारच व विद्यार्थ्यांना मेरीट आधारे प्रवेश देण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

५) विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था निवडीकरिता दि.२७.१२.२०२४ पर्यंत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत वेळ देण्यात येत आहे.

६) प्रशिक्षण संस्थेच्या क्षमता व प्राप्त प्राधान्यक्रम विचारात घेऊन विद्यार्थ्याने कोणत्या प्रशिक्षण संस्थेत जाऊन प्रवेश घ्यायचा आहे याबाबत स्वतंत्रपणे यादी व परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

स्वा/-

(विकास गडपायले)
प्रकल्प व्यवस्थापक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर